


दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७


● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २५ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# राजकीय नेत्यांनी आपली जशी जिरवली तशी त्यांची जिरवा- मनोज जरांगे

## सर्व जाती धर्मांचा जिल्ह्यातून एकच उमेदवार निश्चित करा आणि त्याला अपक्ष निवडणूक लढवायला लावा.

**वादळवार्ता/सराटी**

अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाची बैठक पार पडली. या बैठकीत ते बोलत होते. राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेले 10 टक्के आरक्षण 50 टक्क्यांच्या आत द्यावे, तरच सरकारने दिलेले आरक्षण स्वीकारू. तसेच त्यांनी मी निवडणुकीच्या भानगडीत पडणार नाही, असेही स्पष्ट केले. गावात जाऊन मराठा समाजसोबत बैठक घ्या, उमेदवार कोण



द्यायचा हे निश्चित करण्याचा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. लोकसभा निवडणुकीत सगळ्या जाती धर्माचे उमेदवार उभे करून राजकीय नेत्यांनी आपली जशी जिरवली तशी त्यांची जिरवा. राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नाही, त्यामुळे तुम्हीच आरक्षण देणारे बना, असे आवाहन करत जरांगेंनी समाजाला दोन पर्याय दिले. ते म्हणाले, लोकसभा

**सरकारने मराठा समाजाला ओबीसी नोंदी सापडलेल्या सगेसोयऱ्यांनाही प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटलांनी लावून धरली. सरकारने मात्र १० टक्के स्वतंत्र्य आरक्षण देत समाजाची फसवणूक केली, असाही आरोप जरांगे पाटलांनी केला. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत मी खासदार मोहीम राबवत गावागावांतून उमेदवार देण्याचा निर्णय समाजाच्यावतीने घेतला होता. यावर जरांगे पाटलांनी समाजाला दोन मोठे पर्याय दिले आहे**

निवडणुकीत गावागावांतून अनेक उमेदवार दिल्यास मराठा समाजच अडचणीत येईल. त्यामुळे आपापल्या गावात जाऊन मराठा समाजाची बैठक घेऊन सर्व जाती धर्मांचा जिल्ह्यातून एकच उमेदवार निश्चित करा आणि त्याला अपक्ष निवडणूक लढवायला लावा. किंवा सगेसोयरे कायद्याला ज्या पक्षाचा उमेदवार लेखी बॉण्ड करून पाठिंबा देईल, त्याला पाठिंबा द्या. मग तो कोणत्याही पक्षाचा असो, असे दोन पर्यायही जरांगे पाटील यांनी मराठा समाजासमोर ठेवले आहेत.

मनोज जरांगे पाटलांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची मागणी केली होती. त्याला बगल देत सरकारने एसईबीसी प्रवर्गातून आरक्षण देत फसवणूक केल्याचे जरांगे पाटील म्हणाले. यावर सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नसेल तर आरक्षण देणारे बणा. त्यासाठी 30 मार्चपर्यंत लोकसभेचे उमेदवार निश्चित करा, असे जरांगे पाटलांनी समाजाला आवाहन केले आहे. आता मराठा समाजाला कोण पाठिंबा देणार की समाज अपक्ष उमेदवार उभे करणार, याकडे लक्ष आहे.

## लोकसभा निवडणूक

### भाजपकडून महाराष्ट्रातील उमेदवारांची दुसरी यादी जाहीर,



भाजपकडून महाराष्ट्रातील उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत महाराष्ट्रातील तीन जागांचा समावेश आहे. सोलापुरात राम सातपुते यांना उमेदवारी जाहीर करण्यात आलं आहे. या जागेवर सध्या भाजपचे जयसिद्धेश्वर स्वामी खासदार आहेत. जयसिद्धेश्वर स्वामींचं यावेळी तिकीट कापलं गेलं आहे. राम सातपुतेंना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भंडारा-गोंदियातून सुनील मेंढे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

### याचा विचार उदयनराजेंनीच करायला हवा; संजय राऊत




साताऱ्यातून लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून उदयनराजे भोसले हे दिल्लीत गेले होते. भाजप मुख्यालयात भाजपचे वरिष्ठ नेते, केंद्रीय मंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उदयनराजे भोसले आणि जेपी नड्डा यांच्यात बैठक झाली. सातारा लोकसभा मतदारसंघातून कमळ चिन्हावर उदयनराजे भोसले निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यावर या बैठकीत शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांनी माहिती दिली

### ज्योती मेटे फडणवीसांच्या भेटीला, महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा ट्विस्ट



विरोधकांनी पत्ते उघडल्यानंतर आता भाजप आपली पत्ते उघडताना दिसत आहे. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान आता तोंडावर आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारीख 27 मार्चपर्यंत आहे. या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडून महायुतीत असलेल्या छोट्या पक्षांना महाविकास आघाडीत घेण्याचे प्रयत्न केले जात होते. विशेष म्हणजे रासपचे प्रमुख महादेव जानकर यांनी शरद पवार यांना भेटून आपली नाराजी व्यक्त केली होती. ते महाविकास आघाडीकडून लढवतील, अशी चर्चा होती. तर शिवसंग्रामचे दिवंगत प्रमुख विनायक मेटे यांच्या पत्नी यांनीसुद्धा शरद पवारांची भेट घेतली होती. त्या बीडमधून लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याची माहिती समोर येत होती. असं असताना आज भाजपने वेगळीच खेळी खेळली आहे.

## चार वर्षांच्या मुलीवर या तरुणाने बलात्कार केला.

**वादळवार्ता/दिल्ली**

दिल्लीत चार वर्षांच्या मुलीवर तिच्या ट्यूशनच्या ठिकाणी बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. ही मुलगी ज्या ठिकाणी ट्यूशनला जाते तिथल्या ३४ वर्षीय मुस्लिम तरुणाने तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात पांडव नगरमध्ये आज मोठ्या प्रमाणावर लोक जमा झाले होते. त्यांनी तोडफोड केली आहे तसंच घोषणाबाजीही केली आहे. या ठिकाणी पोलिसांना पाचारण करण्यात आलं आहे नेमकी काय घडली घटना? ३४ वर्षीय मुस्लीम तरुणाला अटक करण्यात आली आहे. चार वर्षांच्या मुलीवर या तरुणाने बलात्कार केला. दिल्लीचे अतिरिक्त पोलीस आयुक्त सागर सिंग यांनी ही घटना शनिवारी घडल्याचं सांगितलं आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आम्ही ३४ वर्षीय आरोपीला अटक




केली आहे. तसंच मुलीवर उपचार सुरु आहेत आणि तिची प्रकृती स्थिर आहे असंही पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. ४ वर्षीय मुलीवर बलात्कार झाल्याची घटना समोर आल्यानंतर पांडव नगर भागात जमाव संतप्त झाला. या जमावाने या ठिकाणी कार आणि इतर भागांची तोडफोड केली. यानंतर या ठिकाणी पोलिसांना पाचारण करण्यात आलं. पोलिसांनी हे म्हटलं आहे घडलेल्या घटनेबद्दल काही अफवा पसरवण्यात आल्या ज्यामध्ये मुलीची प्रकृती गंभीर आहे असं सांगण्यात आलं. या अफवांवर विश्वास ठेवून काही लोकांनी तोडफोड केली. मात्र मी हे आवाहन करते आहे की कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. दिल्ली पूर्व भागाच्या डीसीपी अपूर्वा गुप्ता यांनी हे आवाहन नागरिकांना केलं आहे. मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तिची वैद्यकीय तपासणी झाली आहे आणि तिची प्रकृती स्थिर आहे अशीही माहिती त्यांनी दिली.

## हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात २४ मेंढ्या ठार, ७ गायब

**वादळवार्ता/सांगली**

शेत खतविण्यासाठी बसवलेल्या



शेळ्यामेंढ्याच्या कळपावर हिंस्त्र प्राण्यांनी केलेल्या हल्ल्यात २४ मेंढ्या ठार झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे घडली. या हल्ल्यात ५ शेळ्या जखमी झाल्या असून हिंस्त्र प्राण्यांनी ७ मेंढ्या गायब केल्या आहेत. पलूस तालुक्यातील कृष्णाकाठावरील भिलवडी येथे ही घटना घडली. महावीरनगर रस्त्यावरील चौगुले यांच्या शेतात मोहन हराळे यांचा ३०० शेळीमेंढीचा कळप महिन्यापासून रान खतवण्यासाठी वस्तीला आहे. पहाटे तीनच्या सुमारास कुत्री व मेंढ्यांच्या आवाजाने जाग आल्यानंतर हराळे यांना हिंस्त्र प्राण्यांनी हल्ला केल्याचे दिसून आले. मेंढ्यांच्या नरडे व पोटावर हल्ले झाले होते. यामुळे २४ मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला. या हल्ल्याची माहिती मिळताच वन व पशूसंवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला.

## मोखाडा तालुक्यात खोडाला येथे बहुजन विकास आघाडीचे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचे उद्धघाटन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**

मोखाडा तालुक्यात खोडाला येथे बहुजन विकास आघाडीचे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचे उद्धघाटन माजी खासदार बळीराम जाधव साहेब व ज्येष्ठ नेते विल्सन फर्गोस यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी माजी खासदार बळीराम जाधव साहेब यांनी बोलताना सांगितले की,हे कार्यालय लोकसभा निवडणुकी साठीच चालू केले नाही तर हे कार्यालय १२ ही महिने जन सामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी चालू केले आहे.या ठिकाणी काम घेऊन आलेल्या कार्यकर्त्यांचे कामाचे समाधान होईल तो पर्यंत पाठपुरावा केला जाईल.या कार्यालयात कोणत्याही जातीचा धर्माचा ,पक्षाचा व्यक्ती आला तरी काम केले जाईल असे सांगितले यावेळी त्यांनी २००९ ते २०१४ काळात या भागात केलेल्या कामाला उजाळा दिला व तुम्ही कोणतेही काम असो मला थेट न घाबरता कॉल करा असे सांगितले. यावेळी बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ नेते विल्सन फर्गोस,जव्हार तालुका अध्यक्ष एकनाथ दरोडा,मोखाडा तालुका उप अध्यक्ष रमेश बोटे, सायदे गण प्रमुख अंकुश बोटे,खोडाला गण अध्यक्ष जनार्दन पाटील, गोमघर ग्रामपंचायत सदस्य नरेश पाडेकर,दिनकर ठोंबरे,चंदर बोटे,नांदगाव ग्रामपंचायत सदस्य संतोष भला,विजय वारा,योगेश पुराणे व खोडाला गटातील कार्यकर्ते उपस्थित होते.




## भेंडखळ येथे कमळ चषक २०२४ जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण /विठ्ठल ममताबादे**

कबड्डी खेळ खेळणाऱ्या व कबड्डी स्पर्धेतील खेळाडूंना उत्तम व्यासपीठ मिळावे,कबड्डी खेळाचा जास्तीत जास्त प्रचार प्रसार व्हावा, खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी भेंडखळ तर्फे तसेच सरपंच मंजिता पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने ठाणकेश्वर मैदान,भेंडखळ तालुका उरण येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा कमळ चषक २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे उदघाटन माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी नारळ वाढवून केले.यावेळी आमदार महेश बालदी,जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर,भाजपा तालुकाध्यक्ष रवीशेठ भोईर,नगरसेवक कौशिक शहा, कामगार नेते जितेंद्र घरत,कामगार नेते सुधीर घरत,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पी जे पाटील, भेंडखळ ग्रामपंचायतचे सरपंच मंजिता मिलिंद पाटील, उपसरपंच अक्षता ठाकूर, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी किरण केणी आदी मान्यवर उपस्थित होते. या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेच्या व्यासपीठावर प्रसिद्ध खेळाडू तथा प्रशिक्षक प्रशांत पाटील, मैदान व्यवस्थापक पंकज भोईर,हरेश ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पार पडलेल्या या स्पर्धेत एकूण ३२ प्रसिद्ध संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये टी. बी. एम करावे या संघाने प्रथम क्रमांक पटकविला. तर जय हनुमान वाशी या संघाने द्वितीय, नवकिरण भेंडखळ या संघाने तृतीय तर शिवशंभु या पटनेश्वरी या संघाने चतुर्थ क्रमांक पटकविला आहे.भारतीय जनता पार्टी भेंडखळ व सरपंच मंजिता पाटील, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद पाटील यांनी या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन व आयोजन केले होते.भेंडखळ भाजप अध्यक्ष संजय रामदास ठाकूर,संदीप पाटील,सिद्धार्थ ठाकूर, अमित ठाकूर, प्रितश घरत यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.स्पर्धकांनी, नागरिक ग्रामस्थांनी या रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेचे, आयोजकांचे कौतुक केले.कमळ चषक २०२४ रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा भेंडखळ येथे मोठया उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाले.



## संपादकीय

### पांढर आभाळ..

काय राव साहेब,
कित्येक पिढ्या गेल्या दर
पंचवार्षिक निवडणुकीत
पाण्याचा दुष्काळावर
बिडया फुकल्या...
मराठवाड्यातील असो
की खेडोपाडी तहानलेल्या
विहिरी कोरड्या ओकार्या
देऊन वाझपणाचे डोहाळे
तुम्ही गाता आणि
कित्येक गोरगरिबांचा
तळतळाट घेता कधी
पाण्यावर बोलतात
बोलता धरणात मुतता
मुतता तोल जाऊन पडता
तरी बी उदयाचा आशेवर
गोरगरीब देतात निवडूण..
पंचवार्षिक सभेत
दुष्काळ मुक्त गाव
म्हणता म्हणता नकटिचा
लग्नाला विघ्न आणता ..
भेगाळलेल्या भुईला बघून
बाप रडतो ढसाढसा..
लेकीच लगीन औदां
गळ्याला फासा
पेयचा पाण्याचा
तुटवडा शेतीची तहान
कधी भागायची
दुष्काळी भागात
हिरवी सपान कधी
पडायची आज उदया
करता करता आजा
पंजा मरून गेला
दुष्काळी भाग कधी
पाणभरती नाही झाला ..
कित्येक निधी
दुष्काळावरचे जातात
कुठं शिवारे इचारतात
प्रश्न संकटाच सावट मोठं
साहेब अच्छे
दिन म्हणजे काय ओ
जहाँ डाल डाल पर सोने की
चिडिया करती है बसेरा..
गाण्यातच राहून गेलं..
शेतकरी होरपळतो
ओ शिक्षण , लगीन,
दुष्काळ,ढोर,गुरू नशिब
जळून राख होत करपून जातं
पसाभर पीकाला
हमीभाव नसतो
ना पिकाला तिजोरी आसते
कित्येक शेत्या
भल्या भल्या सिमेंटच्या
बिल्डिंग आणि रोड,
रस्तात कवडिमोल घेताय
हजारो शेतीच्या गर्भाशयात
जेसीबी फिरवून चार
चार पदरी रोड करताय
जलयोजना हजारो वर्षे
आजून का रखडतेय
पाणी पाणी करत लाहि
लाहि गाव होरपळातात
चला खेड्यात वणवा
पेटलेला दिसेल
भुकेबरोबरोबर तहानलेला
शेती आणि
शेतकरी, जनावर
शेती टिकली,पिकली
तर सावट बदलेल..
जगाचा पोशिंदा जगला
तर जग सुखी होईल
शेतीवर सुख अवलंबून
असते पिकलं तर
जगलो आपण नाही तर
शेती जिवणाचा
अविभाज्य घटक आहे..
AC मधून काय कळणार
दुष्काळ फक्त
भाषणातच माहिती
अ स त ो
झळ काय करणार
फासावर मरणाचा
दारात तर तेच जातात
जे हतबल सरकार
पुढं झालेली आसतात
निधी , योजना, मिळत
नसतात पोहचत नसतात
काळया मातीचा
भेगाळलेल्या भुई
जाब इचारते शेतकऱ्याला
सुगीत सभाळतें तुला
उन्हाळयात पाणी
पाज रे मला
वांझपण माझं कुस उजवूदे
कर रान हिरवेगार
पाणी मिळू दे
पाणी पाणी करून
शेत लाहकत
उन्हाचा झळा नाही सोसवत
प ा ण्य ा व ा चू न
मरतो बळीराजा
पीक,पाणी , गुरू ढोर,
संसारात दुष्काळ

कविमन सुवर्णा वाघमारे
महिला बचत गट
प्रबोधन, उद्योजिका
कवियत्रि,

# कवी कल्पना विलास: वसंत ऋतूचा काळ!

हिन्दू दिनदर्शिकेप्रमाणे भारतात माघ आणि फाल्गुन या महिन्यांत वसंत ऋतू असतो. ग्रेगेरीयन दिनदर्शिकेप्रमाणे फेब्रुवारी उत्तरार्ध, मार्च-एप्रिल पूर्वार्ध या महिन्यांत तो असतो. काहींच्या मते त्याचे फाल्गुन आणि चैत्र हे महिने तर शाळांच्या क्रमिक पुस्तकांनुसार चैत्र आणि वैशाख हे महिने आहेत. भारत हा अतिविशाल देश असल्याने देशाच्या विविध भागांत त्यादरम्यान येणारे हिंदू महिने वेगळेवेगळे आहेत. या ऋतूमध्ये झाडाला पालवी फुटते. मात्र वसंत पंचमी- माघ शुद्ध पंचमीपासून वसन्तोत्सव सुरू होतो, हे देशभर मानले जाते. इंग्रजीमध्ये वसंत ऋतूला स्प्रिंग म्हणतात. युरोपात मार्च-एप्रिल हे महिने तर ऑस्ट्रेलियात सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्यांत त्याचे आगमन होते, म्हणतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखात वाचा रोचक व ज्ञानवर्धक माहिती... संपादक.

वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. तो या दिवसापासून सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग या ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. यौवन हा जर आपल्या जीवनातील वसंत असेल तर वसंत हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मीकींनी रामायणात त्याचे अतिशय सुंदर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णानेही गीतेत 'ऋतूनाम् कुसुमाकर:' असे म्हणत त्याची बिरुदावली गायली आहे. शिशिर ऋतूत पानगळ- झाडाची पाने वाळून गळून पडतात. ते यात जोमाने येतात, म्हणून वसंताचा उत्सव हे अमर आशावादाचे प्रतीक आहे. त्याचा खरा पुजारी जीवनात कधी निराश होत नाही. जीवन व वसंत ज्याने एकरूप करून टाकले अशा मानवाला आपली संस्कृती संत म्हणते. ज्याच्या जीवनात वसंत फुलतो तो संत! तो यौवन आणि संयम, आशा आणि सिद्धी, कल्पना आणि वास्तव, जीवन आणि कवन, भक्ती व शक्ती, सर्जन व विसर्जन या सर्वांचा समन्वय साधणारा असतो. तसेच जीवनात सौन्दर्य, संगीत व स्नेह प्रकट करणारा वसंत आपल्या जीवनात साकार झाला तरच आपण त्याच्या वैभवाला जाणले, अनुभवले व पचवले, असे म्हणता येईल. अशा प्रभुस्पर्शींच्या जीवनात नेहमी एकच ऋतू असतो, तो म्हणजे वसंत! त्याची जीवनात एकच अवस्था कायम असते, ती म्हणजे यौवन! संत ज्ञानेश्वरजी महाराज वर्णन करतात-

"जैसे ऋतुपतीचे द्वार|
वनश्री निरंतर|| वोगळे
फळभार| लावण्येसी||"

वसंतपंचमीला 'श्रीपंचमी' असेही म्हणतात. श्रीचा अर्थात लक्ष्मीचा हा जन्मदिवस म्हणून या पंचमीस श्रीपंचमी असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे श्रीसरस्वती पूजनोत्सवाचा हा दिवस असल्यामुळे सुद्धा श्रीपंचमी असे म्हणतात. बंगाली बांधव या दिवशी सरस्वतीच्या प्रतिमा पूजतात. सरस्वतीचा नवसही करतात. मुलांचा विद्यारंभ या तिथीपासूनच होतो. काही धर्मशास्त्रकारांच्या मते कामदेव व वसंत ऋतू यांचे निकटचे नाते पुराणांमध्ये वर्णिले आहे, त्यामुळे दिवशी कामदेव-रतीचीही पूजा व प्रार्थना करावी, अशी प्रथा आहे. तथापि त्याप्रीत्यर्थ खास देवालये नसल्यामुळे लक्ष्मी व विष्णू यांची विविध उपचारांनी पूजा व प्रार्थना करून हा दिवस साजरा करण्यात येतो. आपले पारिवारिक जीवन सुखाचे व समृद्धीचे जावे, यासाठी लोक कामदेव-रतीची पूजा करीत असावेत. काही ठिकाणी वसंतपंचमीला नवान्नेष्टी करतात. शेतातून नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्या देवतेला अर्पण केल्यानंतरच नवान्न भक्षण करावयाचे असते, असे सांगितले जाते. कारण-

"आला वसंत ऋतू आला|
वसुंधरेला हसवायाला||
सजवीत नटवीत लावण्याला|
आला, आला
वसंत ऋतू आला||"

वसंतपंचमीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत वसंतोत्सव साजरा करतात. प्राचीन काळी वसंत ऋतूच्या आगमनाप्रीत्यर्थ सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव वगैरे उत्सव करण्याची प्रथा होती. या निमित्ताने नृत्य, संगीत, वनविहार, जलक्रीडा आदी मनोरंजनात्मक कार्यक्रम केले जात. काही ठिकाणी रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून रंग व गुलाल उडवून हा वसंतोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. वसंत ऋतूमध्ये वृक्षलतांना नवी पालवी फुटते. त्या पानाफुलांनी बहरतात. त्याप्रमाणेच लोकांच्या मनोवृत्तीही उत्साही व आनंदी होऊ लागतात. हा उत्सव या संक्रमणस्थितीचा द्योतक आहे. निसर्ग- सृष्टीप्रमाणेच मानवी जीवनात आनंद व उत्साह वृद्धिंगत व्हावा, या उद्देशानेच हा उत्सव साजरा करण्याची प्रथा रुढ झाली असावी-

"चोहीकडून तो वसंत
येतो, हासत नाचत गाणे गातो!
चराचरांवर जादू करतो,
मनामनाला फुलवीत येतो!
पक्षीकूजन मधुर ऐकू
येते, आसमंत हा गुंगून जावा!
फुलाफुलांतून साद उमलते,
वसंत घ्यावा, वसंत घ्यावा!"

माघ शुक्ल पंचमी ही वसंतपंचमी म्हणून ओळखली जाते. वसंत ऋतूच्या शुभारंभाची ही तिथी होय. चैत्र व वैशाख हे वसंत ऋतूचे महिने मानले गेले आहेत, परंतु माघ महिन्यामध्ये उत्तरायणाबरोबर वसंताची चाहूल लागते व वातावरण उत्साहवर्धक होऊ लागते. ऋतुराज वसंताच्या आगमनाप्रीत्यर्थ पाच ऋतूंनी आपल्या कालावधीतील प्रत्येकी आठ दिवस भेट म्हणून दिले आहेत. पाच ऋतूंचे प्रत्येकी आठ दिवस मिळून झालेले हे चाळीस दिवस चैत्र बलिप्रतिपदेपूर्वी म्हणजे वसंतपंचमीपासून सुरू होतात, असे कविकल्पनात्मक स्पष्टीकरण दिले जाते. प्रारंभी हा दिवस वसंत ऋतूच्या संदर्भातच साजरा होत असावा. परंतु नंतर हिंदुधर्म शास्त्रकारांनी तसेच पुराणकारांनी वसंतपंचमीच्या उत्सवाशी काही धार्मिक कथा जोडलेल्या आढळतात. मात्र कविमन गाते-

"हा वसंत रंग भरीत जगती
येतसे पहा, बहरल्या दिशा दहा!!
कोकिळा ही उपवनात,
अमृत मधुर गीत गात!!
रम्य दिवस चांदरात,
फिरत फिरत भृंग हा!!"

वसंतपंचमीच्या दिवशी धार्मिक व्रतविधी फारसे नसतात. या सणाचे लौकिक अंग अधिक ठळकपणे उठून दिसते. वसंत ऋतूत निर्माण होणाऱ्या चैतन्यदायी वातावरणामुळे उल्हासित झालेल्या मनांचा आविष्कार विविध प्रकारच्या मनोरंजक कार्यक्रमांतून व्यक्त होतो. आनंदाचे प्रकटीकरण हाच या सणाचा उद्देश दिसतो. या दिवशी मुलांना कोणाच्याही बागेत जाऊन फळे तोडण्याची मुभा असते. काही ठिकाणी उत्साही मुले होळीसाठी लाकडे, गवत वगैरे गोळा करण्यास वसंतपंचमीपासून सुरुवात करतात. मंजुळ पक्षीरव ऐकतच-

"नकोत मजला विविध
सुरांचे कृत्रिम हे हिंदोळे।
कोकिळे ऐकव तव मधुर बोल।।
ऋतू वसंतातील
कोकिळ कुहूकुहू बोले।
पांडुरंग आले आले।।"

दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारतामध्ये या सणाला विशेष महत्त्व आहे. राजस्थानमधील राजपूत बांधवांमध्ये हा उत्सव विविधप्रकारे उत्साहाने साजरा केला जातो. समाजातील सर्व थरांतील लोक यामध्ये सहभागी होतात. रथसप्तमी-राजस्थानातील भानुसप्तमीच्या दिवशी सूर्याची पूजा करून त्याच्या रथाची मिरवणूक काढण्यात येते. हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. फाल्गुन महिन्यातील वसंतोत्सव 'फाग' या नावाने ओळखला जातो. फाल्गुन पौर्णिमेला वसंतोत्सव समाप्त होतो, असे सर्वसाधारण मत आहे. मात्र महाराष्ट्रात वसंतोत्सवाला फाल्गुन पौर्णिमेपासून प्रारंभ होत असल्याचे सर्व पंचांग व दिनदर्शिकांमध्ये नोंद आढळते. रंगपंचमीपर्यंत चालणारा रंगोत्सव हाच वसंतोत्सव आहे, असे तर अभिप्रेत नसावे? नाहीतर हे एक न उलगडणारे कोडेच म्हणावे लागेल! !! सर्वांना वसंतोत्सवाच्या आनंददायी हार्दिक शुभेच्छा !!

- संकलक व सुलेखक -
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हाट्सअॅप- ९४२३७१४८८३.
इमेल- nikodekrishna-kumar@gmail.com-

# महायुतीला जागा वाटपाचा तिढा सोडवायचा असेल, तर:.अभिजीत बिचुकलेने काय सांगितलं?

बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले नेहमीच महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत असतात. आता लोकसभा निवडणुकीचा हंगाम आहे. सर्वच राजकीय पक्ष जागा वाटप आणि उमेदवार निश्चितीमध्ये व्यस्त आहेत. महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. महायुती आणि मविआमध्ये अद्यापपर्यंत आपसातील जागा वाटपाचा तिढा सुटलेला नाहीय. काही जागांवर मतभेद आहेत. त्यामुळे राजकीय चित्र स्पष्ट व्हायला वेळ लागतोय. या दरम्यान अभिजीत बिचुकले यांनी त्यांच्या सवयीप्रमाणे वाट्टेल ते दावे केले आहेत. अभिजीत बिचुकले हे त्यांची राजकीय मत मांडतात, स्वत:च्या राजकीय महत्वकांक्षा व्यक्त करतात, तेव्हा त्या अशक्य गोष्टी असतात. त्यातून विनोद निर्मितीच होते. आता सुद्धा अभिजीत बिचुकले यांनी असेच दावे केले आहेत. "सातारा लोकसभेची निवडणूक मी लढणार. अभिजीत बिचुकले सातारा लोकसभेची निवडणूक लढवणार. उदयन राजे यांना दुसऱ्या पक्षात जायची काय गरज?. त्यांना दिल्लीत जावं लागत हे दुर्देवी" असं अभिजीत बिचुकले म्हणाला. "ज्या भाजपवाल्यानी जय भवानी,



जय शिवाजीला विरोध केला त्या भाजप सोबत उदयन राजे का गेले ?" असा सवाल अभिजीत बिचुकले यांनी विचारला. "महायुतीच्याया नेत्यांनी जागा वाटपासाठी माझ्याकडे यावं मी तिढा सोडवतो" असा दावा त्यांनी केला. "अजित पवारांना केवळ 2-3 जागा मिळतात. अमित शाह गुजराती उद्योजक आहेत, सगळे त्यांचे चाकर झाले आहेत. उदयनराजे माझे बंधू होते, आहेत आणि राहणार. मी अनेक निवडणुका त्यांच्या विरोधात लढल्या. पण आम्ही आजही चांगले मित्र आहोत. छत्रपती हे छत्रपती आहेत, ते इकडे तिकडे फिरताहेत हे मला पटत नाही. राज्याला नवी दशा आणि दिशा मी देणार" असा दावा अभिजीत बिचुकले यांनी केला.

# सायन रेल्वे पुलाचा पुनर्विकास लवकरच सुरु, या तारखेपासून तब्बल २ वर्षे वाहतूकीसाठी बंद राहणार

**दैनिक वादळ वार्ता मुंबई** : मुंबईतील ब्रिटीशकालिन सायन रेल्वे स्थानकावरील उड्डाण पुलाची पुनर्बांधणी केली जाणार आहे. येत्या 28 मार्चपासून तब्बल किमान दोन वर्षांसाठी हा पुल वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार आहे. पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसाठी या पुलाला पाडून त्याजागी नवा पुल बांधण्यात येणार आहे. या मार्च 27-28 च्या रात्रीपासून हा पुल वाहतूकीसाठी बंद केला जाणार आहे. याआधी या पुलाचे पाडकाम 20 जानेवारीपासून सुरु करण्यात येणार होते. परंतू स्थानिकांनी विरोध केल्याने आता 28 मार्चपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

सायन रेल्वे स्थानकावरील या उड्डाण पुलाचे आयुष्य संपले आहे. तसेच मध्य रेल्वेच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसाठी देखील या पुलाला पाडून नविन पुलाची उभारणी करण्याची गरज असल्याने या पुलाचे पाडकाम आधी जानेवारी महिन्यात घेण्यात आले होते. त्यास विरोध झाल्याने दुसरी तारीख 28 फेब्रुवारी निश्चित करण्यात आली. परंतू बारावी आणि दहावीच्या परीक्षा जवळ आल्याने या पुलाच्या पाडकामाची तारीख पुढे ढकल्यात आली होती. बारावीच्या परीक्षा मार्च 19 ला तर दहावीच्या परीक्षा 26 मार्च रोजी संपल्याने आता 28 मार्च पासून हा ब्रिटीशकालीन पुल तोडण्याच्या कामाला प्रारंभ होणार आहे. सायन रेल्वे उड्डाण पुलाची उभारणी 24 महिन्यात करण्याची योजना आहे.



जानेवारी 2026 पर्यंत हा पुल बांधून पूर्ण होईल अशी माहीती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. सायनचा हा पुल धारावी, एलबीएस रोड आणि पूर्व द्रुतगती महामार्गाशी कनेक्टेट आहे. मध्य रेल्वेच्या सीएसएमटी ते कुर्ला पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसाठी अधिक जागा लागणार असल्याने जुना जर्जर पुल तोडून त्याजागी नवा पुल आणखी रुंद बांधावा लागणार आहे. या पुलाला वाहतूकीसाठी बंद केल्यानंतर इतर पूर्व आणि पश्चिम कनेक्टर्स सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडवर वाहनांची गर्दी वाढणार आहे. सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड हा मार्ग पूर्व द्रुतगती महामार्ग ते एलबीएस रोड ते पुढे धारावीकडे कनेक्ट होतो.

# उद्या श्री क्षेत्र अश्वत्थलिंग ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान

## पायी दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हा-महंत महादेवानंदजी भारती

**वादळवार्ता/पाटोदा**
श्री.संत श्रेष्ठ एकनाथ महाराज षष्ठी सोहळा प्रित्यर्थ सालाबादप्रमाणे याही वर्षी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनची श्री क्षेत्र अश्वत्थलिंग ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान उद्या दि २६ मार्च २०२४ मंगळवार रोजी होणार असून भाविकांनी बहुसंख्येने या पायी दिंडी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थांनचे मठाधिपती श्री श्री १००८



गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे. दि.२६ मार्च मंगळवार रोजी सकाळी ८:३० वा.श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान येथून प्रस्थान होणार असून १०:३० वा.पिंपळवंडी येथील हनुमान मंदिरात पायी दिंडीचे आगमन झाल्यानंतर येथे दिंडीतील वारकऱ्यांना चहा व नाश्ता देण्यात येऊन तसेच दुपारी १२:१५ वा.अंमळनेर येथे जेवणाची व्यवस्था होणार आहे.दि.२७ मार्च बुधवार रोजी लालपुरी (पिंपळनेर) येथे संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळा व बिजोत्सव कार्यक्रम संपन्न होईल. पायी दिंडी सोहळा दि.२६ मार्च ते २ एप्रिल यादरम्यान होत असून पायी दिंडीचा पिंपळवंडी,अंमळनेर,भडकेल, पिंपळनेर, टाकळी फाटा,तांबेवाडी,जांभळी, सोनोशी, तोंडोळी,शिंगोरी,अंतरवली(जनीची ),बेलगाव,चापडगाव,गदेवाडी या ठिकाणाहून प्रवास होऊन पायी दिंडी दि.३० मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दिंडी मुक्कामी ठिकाणी हरिकिर्तन व भजनाचे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

# जीवन शिक्षण विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कचऱ्याची होळी करुन पाणीबचत व पर्यावरणाचे रक्षण करण्याची घेतली शपथ .



**वादळवार्ता/किल्ले धारूर**
धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये अवस्थानी असलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील कचऱ्याची होळी करून पाणीबचत व पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेतली आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने सगळीकडे पाणी- पाणी होत आहे यातच होळी हा महत्त्वाचा सण उन्हाळ्यामध्ये येतो परंतु या होळीला पाणी बचत करणे व पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे यामुळे जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी होळीसाठी शालेय परिसरामध्ये, वर्गामध्ये जमा झालेला कचरा एकत्रित करून त्याची होळी केली तसेच पाचही दिवस लाकडे न जाता पर्यावरणाचे रक्षण करा त्याचबरोबर कोरडा रंग खेळा ,रंग खेळून पाणी वाया घालू नका असा महत्त्वाचा संदेश विद्यार्थ्यांनी नागरिकांना दिला आहे तसेच होळीमध्ये पुरणपोळी न टाकता केवळ थोडासा तुकडा टाकावा व ती पोळी गरिबांना खाण्यासाठी द्यावी त्याचबरोबर विनाकारण कोणालाही रंग लावू नये . कोणाच्याही नावे ओरडू नये अशी शपथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आज घेतली आहे यामुळे विद्यार्थी आता कोरडा रंग खेळणार असून होळी करा लहान- पोळी करा दान असा महत्त्वाचा संदेश समाजाला देणार आहेत. ही होळी प्राचार्य विजयकुमार मुंडे ,मुख्याध्यापक धनराज घुगे उपमुख्याध्यापक अरुण समुद्रे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली.

याप्रसंगी विद्यालयाचे सहशिक्षक महादेव केदार, मंगल वटाणे भारती सोनवणे, नाथा ढगे ,हनुमंत काळे, प्रमोद कोमटवार , युवराज जाधव, नितीन सुतार यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक कर्मचारी वृंदा मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या होळीचे धारूर तालुक्यामध्ये सर्वत्र कौतुक होत असून विद्यार्थ्यांनी दिलेल्या महत्त्वाच्या संदेशाचे अभिनंदन होत आहे.

# मी शूरवीर योद्धा, तुमच्यासाठी युद्ध लढेन, पंकजा मुंडे यांचं परळीकरांना आश्वासन

**वादळवार्ता/बीड**
भाजप नेत्या पंकजा मुंडे आज बीड जिल्ह्यातील परळीत दाखल झाल्या. त्यांचं परळीत जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी पंकजा मुंडे या पारंपारिक बंजारा समाजाच्या वेशात दिसून आल्या. यावेळी पंकजा यांनी परळीकरांना लोकसभेत मतदान करण्याचं आवाहन केलं. “मी खूप लोकांचे हाल पाहिले. पण जेव्हा सत्ता आली तेव्ही मी सर्व काही केलं. मला आज लोकं म्हणतात तुमच्या निवडणुकीचा मुद्दा काय? मी सांगते, 2014 ते 2019 मध्ये मी केलला विकास आणि मी निर्माण केलेला विश्वास. हा मुद्दा प्रत्येत जातीपातीची भिंत पाडून टाकणार आहे”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या. “या जिल्ह्यात राष्ट्रवादी आमच्यासोबत आली आहे. त्यामुळे मला आता जिल्ह्यात जास्त फिरता येईल. परळी म्हटलं की चिंता कमी करावी लागेल. सर्वजण कामाला लागतील. तुमची बहीण यावेळी संसदेत जाणार आहे. मी शूरवीर योद्धा आहे. तुमच्यासाठी संसदेत बसून युद्ध लढेन. दांडपट्टा घालून माझ्या वंचितांसाठी, बंजारा बांधवांसाठी चंद्र, सूर्य, तारे सुद्धा तोडून आणावे लागले तर तेही करेन”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री अशोकजी तांदळे यांनी केले तर प्रास्ताविक श्रीमती डोंगरे उज्वला यांनी करून उपस्थितांचे आभार श्रीमती मुंडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी श्रीमती पव्हणे मॅडम,श्री तेलप सर,श्री ठोकरे सर,श्रीमती कवडकर मिना यांनी परिश्रम घेतले. “यावर्षी कारखान्याच्या चिमणीतून धूर निघणार म्हणजे निघणार. फक्त तोंडावर बोलतात लोकं. तोंडावर वेगळं आणि



पाठीमागे वेगळं बोलणाऱ्या लोकांवर विश्वास ठेवू नका. जे पोटात आहे तेच ओठात आहे ही गोपीनाथ मुंडेची लेक आहे. मी कधीच खोटं बोलणार नाही. मी तुमच्या विकासासाठी माझ्या आयुष्याचा प्रत्येक क्षण दिला आहे”, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.पंकजा यांच्याकडून वडिलांच्या आठवणींना उजाळा यावेळी पंकजा मुंडे यांनी आपले वडील गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींनादेखील उजाळा दिला. “गोपीनाथ मुंडे यांना सर्व सामाजांचं खूप प्रेम मिळवलं. असा कुठला समाज नाही जो गोपीनाथ मुंडे यांची आठवणी सांगत नाही. आताच माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची आठवण झाली. गोपीनाथ मुंडे विरोधी पक्षनेते होते. ते सुधाकरराव नाईक यांच्याकडे आशीर्वाद घ्यायला गेले. तेव्हा मलाही घेऊन गेले. मला अजून आठवतं की, त्यांनी मला वर्षा बंगल्यावर नाष्टा खाऊ घातला. माझ्या वडिलांना म्हणाले, गोपीनाथ तुला सागर बंगला देतो. विरोधी पक्षनेत्याला कधीच सागर बंगला मिळाला नाही. पण मी तुला देतो. कारण तू सामान्य माणसांचा, वंचितांचा काम करशील. पक्ष कुठलाही असेल, पण त्यांनी गोपीनाथ मुंडे यांना आशीर्वाद दिला. यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी कधीच मागे वळून पाहिलं नाही”, अशी आठवण पंकजा मुंडे यांनी सांगितली.

# प्राचार्य राहुल गदळे यांच्या दहिफळ वडमाऊली येथील घरावरच्या दरोड्याचा प्रयत्न फसला !

## दोन विना नंबरच्या गाड्यातुन आलेल्या दरोडेखोरांच्या अंगावर खाकी रंगाचे कपडे असल्याचा संशय !

**वादळवार्ता/केज**
भाजपचे नेते आणि काळेगाव घाट येथील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राहुल गदळे यांच्या दहिफळ वडमाऊली येथील घरावर अज्ञात सात ते आठ लोकांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या घरा असलेल्या शेजाऱ्यांमुळे त्यांचा प्रयत्न फसला.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील भाजपचे नेते आणि काळेगाव घाट येथील महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांचे वडील सखाहरी गदळे तात्या हे दहिफळ वडमाऊली येथील राहत असल्या घरी दि. २३ मार्च रोजी मध्यरात्री घरा समोर विना नंबरच्या दोन पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार मधून सात ते आठ अनोळखी दरोडेखोर आले. त्यातील एकाने त्यांच्या घरा समोर लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा फोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी त्यांच्या घराशेजारी असलेल्या शेजाऱ्यांना चाहूल लागल्याने दरोडेखोर घरात प्रवेश न करता पळून गेले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

दरम्यान त्या चोरट्या पैकी दोघांच्या अंगावर खाकी रंगाचे कपडे असल्याची चर्चा आहे. प्राचार्य प्रा. राहुल गदळे यांच्या तक्रारी वरून दि. २४ मार्च रोजी केज पोलिस ठाण्यात सात ते आठ अज्ञात चोरट्या विरुद्ध गु. र. नं. १४४/२०२४ भा. दं. वि. १४७, १४८, १४९ आणि ४५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाहॉक बाळराजे सोनवणे हे पुढील तपास करीत आहेत.

# अंबाजोगाईतील सकलेश्वर मंदिराच्या उत्खननास सुरुवात

## दोन मंदिरांचा पाया सापडला

**वादळवार्ता/अंबाजोगाई**
येथील ऐतिहासिक ठेवा असलेल्या पुरातन सकलेश्वर (बाराखांबी) मंदिराच्या दुसऱ्या टप्प्यातील उत्खननास सुरवात झाली आहे. या ठिकाणी आणखी दोन मंदिरांच्या पायांचा अवशेष आढळला असून, पाच नव्हे तर आणखी काही मंदिरांचे समूह या ठिकाणी असण्याचा अंदाज आहे. राज्याच्या पुरातत्त्व (छत्रपती संभाजीनगर) विभागाने याचे काम सुरू केले आहे. या उत्खननाचे काम पूर्ण झाल्यानंतर सकलेश्वर मंदिराचे पुनर्निर्माणही केले जाणार आहे. सकलेश्वर मंदिर हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा प्रस्तावही यापूर्वी (२०२३) पुरातत्त्व ब्व वस्तुसंग्रहालय विभागाने राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागास पाठविलेला आहे. सकलेश्वर मंदिराचे दुसऱ्या टप्प्यातील उत्खनन करण्यासाठी महिनाभरापूर्वी प्रशासकीय मान्यता



मिळाली होती. त्यासाठी ३४ लाख ७३ हजारांच्या निधीलाही मान्यता मिळाली आहे. याच निधीतून हे उत्खनन करण्यात येत आहे. १५ मार्च २०२४ पासूनच या कामाला सुरवात झाली असली, तरी मुख्य काम दि.२३ मार्च शुक्रवार पासून सुरू झाले आहे. जेवढे काम करावयाचे, तेवढ्या सीमारेषा (१० बाय १०) आखून याचे काम सुरू केले. पुरातत्त्व विभागाचे १० जण, त्यात तांत्रिक व आकाश ऑर्किओलॉजी यांचाही समावेश आहे. याबरोबरच ५० मजूरही कार्यरत असल्याचे सहायक संचालक अमोल गोटे यांनी सांगितले. सकलेश्वर मंदिराचे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व लक्षात घेता हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करावे, असा संचालनालयाचा अभिप्राय आहे. म्हणून हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करावे, अशी शासकीय स्तरावर मान्यता मिळावी, असा प्रस्ताव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाला पाठविलेला आहे. पुरातत्त्वीय उत्खननानुसार हे काम सुरू झाले असून, मागील दोन दिवसांत या ठिकाणी आणखी दोन मंदिरांच्या पायाचे अवशेष आढळले आहेत. शिखराला असणाऱ्या कोरीव विटांचे तुकडे, शिल्पावशेष, मूर्तीच्या हाताचे भाग असे अवशेष आढळत आहेत. सकलेश्वर (बाराखांबी) मंदिर हे यादवकालीन स्थापत्य शैलीचा सुंदर नमुना आहे. या मंदिराचा सभामंडप १२ स्तंभावर उभा असल्याने याला बाराखांबी हे नाव रूढ झालेले आहे. या स्तंभावरील शिल्पे कलात्मक अतिशय असून, काही स्तंभावर स्त्री शिल्पे कोरण्यात आलेली आहेत. यादवकालीन एका शिलालेखावर असलेल्या उल्लेखानुसार, या मंदिराचे बांधकाम १२२८ मध्ये केलेले असावे. या मंदिराचा सभोवताल व पुरातन अवशेष पाहता, याठिकाणी पाच मंदिरांचा समूह असावा, कारण पहिल्या टप्प्यातील उत्खननात काही मंदिरांचा पाया (बेसमेंट) आढळून आलेले आहे. महिनाभर उत्खननाचे काम चालणार पुरातन दृष्टिकोनातून या भागाला महत्त्व असून, या ठिकाणी विविध मंदिरांचा समूह असण्याची शक्यता आहे. हे काम पुढील महिना ते दीड महिना सुरू राहणार असून, या उत्खननातून संशोधन व रचनात्मक काम करण्याचा हेतू आहे. अमोल गोटे, सहायक संचालक, पुरातत्त्व विभाग

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

## मुसळगाव येथील प्रकल्पग्रस्ताचे रखडलेले प्रश्न तातडीने सोडवा.

सिन्नर/ सुरेश इंगळेमागील १५ वर्षापासून मुसळगाव येथील इंडियाबुल्स या प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी व उद्योजक यांचे अनेक प्रश्न रखडलेले आहेत. व हे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावे यासाठी



आमदार सत्यजित तांबे यांनी जिल्हा अधिकारी जलज शर्मा यांच्यासोबत बैठक घेतली या बैठकीत भूसंपादन अधिकारी सुद्धा उपस्थित होते. आणि बैठकीनंतर लगेचच प्रकल्पग्रस्ताचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिले. धोरणात्मक प्रश्न सोडवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचा निर्णय ही या बैठकीत झाला.

# बकुळफुले वाचकांच्या मनाचा ठाव घेणारं पुस्तक ठरेल

### अमर हबीब यांचे मत

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

"बकुळफुले" वाचकांच्या मनाचा ठाव घेणारं पुस्तक ठरेल असे मत ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अमर हबीब यांनी व्यक्त केले. येथील ज्येष्ठ नागरिक व उत्तम वाचक तुळशीदास पल्लेवार यांनी लिहिलेल्या "बकुळफुले" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात अमर हबीब बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार होते. आपल्या विस्तारीत मनोगतात अमर हबीब पुढे म्हणाले की, "बकुळफुले" या पुस्तकात शब्दबद्ध करण्यात आलेली सर्व पात्रे ही लेखकाच्या नातेसंबंधातील असले तरी ते सर्व या अंबाजोगाई शहरातील प्रातिनिधिक पात्रे आहेत, त्यामुळे "बकुळफुले" हे ठराविक कुटुंबापुरते मर्यादित नाही तर ती सर्वांचेच प्रातिनिधिक स्वरूपातील आहेत असे मत व्यक्त केले. "बकुळफुले" लिहितांना लेखकाने आपले लिखाण कौशल्य पणाला लावले असून हळव्या आणि दुख-या घटनांची मांडणी अत्यंत कमी शब्दात मार्मिकपणे केली आहे. आपल्या कुटुंबातील आणि सहवासातील व्यक्ती बद्दल लिहितांना लेखकाने हातचे काही राखून ठेवले नाही किंवा उगीच पाल्हाळपणे ते पात्र रंगविण्याचा अथवा थांबवण्याचा ही प्रयत्न केला नाही. लालित्यपूर्ण भाषेत लिहिलेले "बकुळफुले" हे वाचकांच्या मनाचा ठाव घेणारे पुस्तक ठरेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रारंभी लेखक तुळशीदास पल्लेवार यांनी आपल्या मनोगतात "बकुळफुले" लिहिण्यामागील आपली प्रेरणा व कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दलची माहिती दिली. मुर्त स्वरुपात असणाऱ्या या पुस्तकाला पुर्णत्वाच्या स्वरुपात आणण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी पुस्तक शब्दबध्द केलेल्या अनेक बकुळ फुलांच्या आठवणीं अधोरेखित केल्या. "बकुळफुले" ही केवळ स्मरणिका नाही तर ती या परिवाराची डॉक्युमेंटरी झाली आहे. परिवारातील ज्या सदस्यांनी ही "बकुळ फुले" पाहिलेली आहेत, अनुभवलेली आहेत, एवढेच नव्हे तर या बकुळ फुलांच्या सुवास ही घेतला आहे त्यांना आणि ज्यांनी ही "बकुळफुले" पाहिलेली नाहीत त्यांच्या साठी ही डॉक्युमेंटरी निश्चित उपयोगी पडेल असे म्हटले आहे.

येथील हॉटेल साई पॅलेस येथिल फंक्शन हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक महिला मंचच्या इंदु पल्लेवार यांनी केले. या कार्यक्रमात दिपक श्रीरामवार, सेवानिवृत्त




गटशिक्षणाधिकारी काशिनाथ रापतवार, कमलाकर पल्लेवार, कल्पना पल्लेवार, खुषी पल्लेवार, राजेंद्र रापतवार, विवेक पल्लेवार, व इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुनम पल्लेवार यांनी केले तर आभार पुजा पल्लेवार यांनी मानले."आम्ही काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे दिल्लीतले नेते रमेश चेन्नीथला यांना पत्र लिहिलं आहे. तर राज्यातील काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पत्र लिहिलं आहे. त्यामुळे आम्ही अशी आशा करतोय की, काँग्रेसचं महाराष्ट्रातील कोणत्या सात जागांवर एकमत झालं तर चांगलं आहे. नाही झालं तर खर्गेंनी येऊन आम्हाला कळवावं, असं आम्ही त्यांना सांगितलं आहे", असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

## महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट, महायुती कडून महादेव जानकर यांच्या पक्षाला एक जागा

**वादळवार्ता/प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट आलाय. कारण गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून छोट्या पक्षांना विचारात घेतलं जात नाही, अशी नाराजी दर्शवणारे रासप नेते महादेव जानकर यांनी महायुतीतच राहण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे महादेव जानकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे महादेव



जानकर महाविकास आघाडीकडून लोकसभेची निवडणूक लढतील, अशी चर्चा होती. या सर्व चर्चांनंतर आता राजकारणात ट्विस्ट आणणारी घटना घडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. तसेच अजित पवार यांच्या गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. या बैठकीत जागावाटपाबाबत चर्चा झाली. यावेळी महादेव जानकर यांच्या पक्षाला एक जागा सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ही बैठक सुरु असताना सुनील तटकरे आणि महादेव जानकर वर्षा बंगल्याच्या बाहेर आले. यावेळी त्यांनी याबाबतची माहिती दिली. महादेव जानकर हे परभमी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

## विदर्भात काँग्रेसला मोठं खिंडार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा धक्काआमदाराचा राजीनामा

**दैनिक वादळ वार्ता**
**विदर्भात**

विदर्भात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कारण काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. तसेच राजू पारवे यांनी आमदारकीचादेखील राजीनामा दिला आहे. राजू पारवे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश झाल्याची माहिती समोर येत आहे. स्वत: राजू पारवे यांनी 'टीव्ही 9 मराठी'ला प्रतिक्रिया देताना पक्षप्रवेश





झाल्याची माहिती दिली आहे. राजू पारवे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी त्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी आज दाखल झाले. राजू पारवे हे शिवसेनेच्या तिकीटावर रामटेक लोकसभेची जागा लढवणार आहेत. राजू पारवे यांनी 'टीव्ही 9 मराठी'ला प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी आपली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करण्याची इच्छा असल्याचं म्हटलं.

"या देशाचे लोकमान्य नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली. सोबतच या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमचे नेते देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या सगळ्या नेत्यांच्या नेतृत्वात मला काम करण्याची संधी मिळाली. आता मी महायुतीसोबत काम करणार आहे. मी या सर्व नेत्यांचे खूप धन्यवाद मानतो", अशी प्रतिक्रिया राजू पारवे यांनी दिली.

## ग्रामीण शिक्षण व्यवस्था मोडीत काढणारा निर्णय रद्द करा - महेश ठाकरे

### शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे प्रहार शिक्षक संघटनेची मागणी.

**वादळवार्ता/प्रतिनिधी**

दि.१५ मार्च २०२४ रोजी निर्गमित झालेला संचमान्यतेचे नवीन सुधारित निकष दर्शविणारा शासन निर्णय म्हणजे ग्रामीण भागातील शाळांसाठी धोक्याची घंटा असून भविष्यात मोठ्या प्रमाणात शिक्षकांना अतिरिक्त ठरविणारा आहे. हा शासन निर्णय राज्यातील कष्टकरी, वंचित बहुजनांना शिक्षणापासून दूर करणार असून सदर शासन निर्णय रद्द करण्याची मागणी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी शिक्षणमंत्री व शालेय शिक्षण सचिव यांच्याकडे निवेदनातून केली आहे. या निर्णयानुसार वर्ग १ ते ५ करिता २० ते ३० विद्यार्थी असल्यास एक शिक्षक, व त्यानंतर प्रति ३० विद्यार्थी एक शिक्षक निश्चित केले आहे.सहा ते आठ करिता ६० ते १०५ विद्यार्थ्यांसाठी तीन शिक्षक व त्यानंतर प्रति ३५ विद्यार्थी एक शिक्षक, व वर्ग ९ ते १० करिता ४० ते १०० विद्यार्थ्यांसाठी ३ शिक्षक व त्यापुढे प्रती ४० विद्यार्थी असल्यास एक शिक्षक मंजूर केला जाईल अशी तरतूद केली आहे. यामुळे ग्रामीण भागातील ज्या शाळे मधील तुकड्यांमध्ये वीस



पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तिथे शिक्षक मंजूर होणार नाही व अस्तित्वात असलेल्या अनेक शिक्षकांना अतिरिक्त ठरवले जाईल. मुख्याध्यापक पदाकरिता आता विद्यार्थी संख्या १५० आवश्यक राहील.१३५ च्या खाली विद्यार्थ्यी संख्या असल्यास मुख्याध्यापक पद रद्द होईल.असे अनेक प्रकारचे बदल या नवीन सुधारित निर्णयामध्ये असून हा निर्णय शिक्षणक्षेत्रा करिता व विशेष करून ग्रामीण भगातील शिक्षण व्यवस्थेला मोडीत काढणारा आहे. ग्रामीण भागातील सामान्य वंचित , कष्टकरी यांच्या भावी पिढीचे शैक्षणिक भवितव्य नष्ट करणारे हे अन्यायकारक धोरण असल्याचा आरोप करीत प्रहार शिक्षक संघटनलनेच्या वतीने या निर्णयाचा जाहीर निषेध करीत असल्याचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी शालेय शिक्षण मंत्री व शालेय सचिव यांना दिलेल्या निवेदनातून केला असून हे अन्यायकारक धोरण तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.निर्णय रद्द न झाल्यास राज्यस्तरीय आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

....अन्यथा राज्यस्तरीय आंदोलन उभे करू

१५ मार्च २०२४ रोजीचे धोरण ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला मोडीत काढणारे असून हे अन्यायकारक धोरण शिक्षण हक्क कायद्याला पायदळी तुळवणारे आहे.शासनाने निर्गमित केलेले संच मान्यता धोरण तात्काळ रद्द करावे अन्यथा संघटनेच्या माध्यमातून राज्यस्तरीय आंदोलन उभे करू.प्रसंगी न्यायालयीन लढा देखील लढू.

- महेश ठाकरे , राज्याध्यक्ष , प्रहार शिक्षक संघटना.

# भारतीय बौद्ध महासभा माजलगाव शाखेच्या वतीन फाल्गुण पोर्णिमा साजरी

**वादळवार्ता/माजलगाव :**

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका शाखेच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे वर्ष भरातील सर्व पोर्णिमा तसेच सर्व महापुरुषांच्या जयंत्या विविध उपक्रमाने साजरी केल्या जातात याचाच एक भाग म्हणून दि २४ मार्च २०२४ वार रविवार रोजी फाल्गुण पोर्णीमा साजरी करण्यात आली त्याच निमित्तान मागील महिन्यात साजरा करण्यात आलेल्या त्यागमुर्ती माता रमाई व बुद्ध मुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब बैठक आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला उपाध्यक्षा आद.लिलाताई उजगरे या होत्या या कर्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव बीड पुर्व आद.शामभाऊ वाघमारे, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला सरचिटणीस शोभाताई भोजने, जिल्हा पर्यटन सचिव आद.के व्ही साळवे सर वंचित बहुजन आघाडी चे नेते आद.अंकुश आण्णा जाधव,आद. भारत तांगडे आद.धम्मानंद साळवे ,सेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे, पत्रकार सुहास बोराडे, बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे,क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर, नाथाजी घडसे बहुजन समाज पार्टी चे महासचिव हरिभाऊ साळवे,





इंजिनियर नवनाथ गायकवाड,अश्विन टाकणखार, दिनेश निसर्गंध,बळीराम सिरसट, माजीसैनिक शंकर वाघमारे सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी पोटभरे आप्पा यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी मानले या ठिकाणी डॉ भागवत साळवे यांनी त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती व बुद्ध मुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब अहवाल सर्वांन समोर वाचुन दाखवला या वर विचार विनिमय करुन सर्व उपस्थित पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका यांच्या समोर हिशोब प्रमाणित करण्यात आला या ठिकाणी ,आद के व्ही साळवे सर यांनी फाल्गुण पोर्णिमा चे महत्व पटवुन दिले व बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा चे महत्व पटवुन देत बावीस प्रतिज्ञा चा जास्तीत जास्त प्रचार प्रसाराचे काम धम्म प्रचारकांनी करावा असे प्रतिपादन केले तसेच शामभाऊ वाघमारे, पत्रकार सुहास बोराडे यांनी मार्गदर्शन केले बौद्ध धम्म ग्रामीण भागा पर्यंत पोहचवण्याच काम भारतीय बौद्ध महासभा करत आहे व पुढेही भारतीय बौद्धमहासभेलाच करावे लागेल असे प्रतिपादन आद लिलाताई उजगरे यांनी अध्यक्षिय समारोपात केले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या मंदाताई साळवे, विशाखाताई वाघमारे, मायाताई स्वामी, प्रकाश साळवे,दयानंद साळवे ,भानूदास साळवे , मोहन काकडे,भगवान डोंगरे, बाबासाहेब घनघाव , रेखाताई भारसकर,शारदाताई तांगडे, अनुराधाताई साळवे,नितिन डोंगरे, भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधीकारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )